# वसई-विरार शहर महानगरपालिका
## आपत्ती व्यवस्थापन विभाग

दि.०८/०६/२०२३

## प्रेसनोट

## महानगरपालिका प्रभाग समिती निहाय आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष सुरु

वसई विरार शहर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत महानगरपालिका कार्यक्षेत्रात पावसाळयात उद्भवणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करणेसाठी महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समिती कार्यालयांमध्ये आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच दिवाणमान येथील कायमस्वरूपी असलेले मुख्य आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष हे सुरूच असून आपत्ती व्यवस्थापन कक्षांमार्फत पावसाळयात उद्भवणाऱ्या समस्या, निर्माण होणाऱ्या अडचणी, नैसर्गिक आपत्ती यांचे निराकरण केले जाणार आहे.

पावसाळयात झाडे उन्मळून पडणे, पावसाचे पाणी साचून वाहतूक कोंडी होणे, पाणी तुंबणे इ. विविध समस्या निर्माण झाल्यास तसेच एखादी दुर्घटना घडल्यास तेथे तात्काळ मदत मिळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्यात आले आहेत. नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून येथील दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क करून नागरिकांना पावसाळयात उद्भवणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करून घेता येईल.

**आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे संपर्क क्रमांक**

| अ.क्र. | प्रभाग समितीचे नाव | नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती 'ए' बोळींज | ९६६५००२८२० |
| २. | प्रभाग समिती 'बी' विरार पूर्व | ९६६५००२८४७ |
| ३. | प्रभाग समिती 'सी' चंदनसार | ९६६५००३२७२ |
| ४. | प्रभाग समिती 'डी' आचोळे | ९६६५००३३६४ |
| ५. | प्रभाग समिती 'ई' नालासोपारा | ९६६५००३५११ |
| ६. | प्रभाग समिती 'एफ' पेल्हार | ९६६५००३८४५ |
| ७. | प्रभाग समिती 'जी' वालीव | ९६६५००३८८७ |
| ८. | प्रभाग समिती 'एच' नवघर-माणिकपूर | ९६६५००४४८४ |
| ९. | प्रभाग समिती 'आय' वसई | ९६६५००४०५५ |
| १०. | मुख्य आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, दिवाणमान | ०२५०२३३४५४६/ २३३४५४७/ ७०५८९१११२५/ ७०५८९९१४३० |

तरी सर्व नागरिकांनी पावसाळयात काही समस्या उद्भवल्यास वरील आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षांशी संपर्क साधावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका यांचेतर्फे करण्यात येत आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका